M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education, Mumbai
Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, वाशी,नवी मुंबई-४०० ७०३.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महत्त्वाचे

क्र.मुंविमं/शाखा एन/ 1433
नवी मुंबई - ४०० ७०३
दिनांक - १३/०३/२०२६
14

प्रति,
सर्व मान्यताप्राप्त शाळांचे मुख्याध्यापक,
तसेच कनिष्ठ महाविद्यालय यांचे प्राचार्य,
जिल्हा मुंबई/ठाणे/पालघर/रायगड

विषय - दुय्यम गुणपत्रिका व प्रमाणपत्र मिळणेसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना आवश्यक कागदपत्रांमधील हमीपत्र / प्रतिज्ञापत्र (AFFIDAVIT) / घोषणापत्राबाबत...

मुंबई विभागीय मंडळ, वाशी, नवी मुंबई या विभागातील सर्व मान्यताप्राप्त शाळांचे मुख्याध्यापक तसेच कनिष्ठ महाविद्यालयांचे प्राचार्य यांना उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) / उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेचे व्दितीय गुणपत्रक / प्रमाणपत्र (Duplicate Marksheet / Certificate), तात्पुरते प्रमाणपत्र (provisional Certificate) व स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) साठी दिनांक १९/११/२०२५ पासून मंडळाच्या www.mahahsscboard.in या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने विद्यार्थी / पालक यांचेमार्फत अर्ज स्विकारण्यात येत आहेत.

अर्ज सादर करताना विद्यार्थी/पालक यांचे मार्फत सादर करावयाचे हमीपत्र / प्रतिज्ञापत्र / घोषणापत्रांच्या नमुन्यांमध्ये एकसारखेपणा राहण्यासाठी राज्यमंडळामार्फत हमीपत्र / प्रतिज्ञापत्र / घोषणापत्राचा नमुना निश्चित करण्यात आलेला आहे. सदर नमुना सर्व मान्यताप्राप्त शाळांचे मुख्याध्यापक तसेच कनिष्ठ महाविद्यालयांचे प्राचार्य यांना या पत्रासोबत मुंबई विभागीय मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

(ज्योत्स्ना शिंदे पवार)
विभागीय सचिव (प्र.)
महाराष्ट्र राज्य माध्य व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३

Telephone : 27652445,27662504,27881077,27881075,27899987 * Fax : 27659491/27881349
Email : certificate.mumbaiboard@gmail.com * Website : www.sscboardmumbai.in

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) / उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षांचे व्दितीय गुणपत्रक / प्रमाणपत्र / स्थलांतर प्रमाणपत्र/ तात्पुरते प्रमाणपत्र मिळविण्यासाठी विद्यार्थी /पालक यांनी सादर करावयाचे

प्रतिज्ञापत्र (Affidavit)

टीप

१. विद्यार्थी सज्ञान नसल्यास (वय १८ वर्षापेक्षा कमी असल्यास) सदरचे प्रतिज्ञापत्र पालकांनी भरून द्यावयाचे आहे.
२. महिला अर्जदारांकरीता त्यांचे आधारकार्ड वरील व गुणपत्रक/ प्रमाणपत्रावरील नाव हे वेगवेगळे असल्यास प्रतिज्ञापत्रात दोन्ही नावे दर्शविण्यात यावीत

विद्यार्थी/पालक अर्जदाराचे पूर्ण नाव श्री/श्रीमती (संपूर्ण नाव) ——————————————

पाल्याचे नाव कुमार/कुमारीका ——————————————

विद्यार्थीनीचे नाव (नावात बदल असल्यास लिहावे)

(गुणपत्रक/प्रमाणपत्रावरील) ——————————————

(आधारकार्डवरील) ——————————————

बैठक क्रमांक ———— परीक्षा वर्ष ———— इ.१० वी / इ.१२ वी ————

विद्यार्थी/ विद्यार्थीनीचे वय ————व्यवसाय ———— राहणार ————

(पिनकोडसह पत्ता)

पोस्ट ———— तालुका ———— जिल्हा ————

असे प्रतिज्ञापत्र लिहून देतो/देते की, मी अर्जात नमूद केलेला बैठक कमांक माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) / उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेचा असून माझे/ माझ्या पाल्याचे व्दितीय गुणपत्रक / प्रमाणपत्र / स्थलांतर प्रमाणपत्र/ तात्पुरते प्रमाणपत्र हे गहाळ झालेले असल्याने त्याची व्दितीय प्रत मिळण्यासाठी सदरचे प्रतिज्ञापत्र लिहून देत आहे.

सदरच्या व्दितीय गुणपत्रक / प्रमाणपत्र / स्थलांतर प्रमाणपत्र/ तात्पुरते प्रमाणपत्र याचा इतर कोणत्याही कारणासाठी मी गैरवापर करणार नाही.

तसेच मला मिळालेले व गहाळ झालेले मूळ गुणपत्रक / प्रमाणपत्र / स्थलांतर प्रमाणपत्र/ तात्पुरते प्रमाणपत्र सापडल्यास ते कार्यालयास परत करीन मात्र त्यासाठी भरलेले शुल्क परत मागणार नाही.

वर उल्लेख केलेली माहिती खरी असून सदरची माहिती खोटी आढळून आल्यास दंड संहिता कलम १९९/२००/१९३ (२) मधील तरतुदीनुसार किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर कारवाई केली जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

दिनांक

ठिकाण (स्थळ).....

स्वाक्षरी अर्जदार/पालक/विद्यार्थी

नावं ——————————

प्रतिज्ञापत्र करणा-याचे नाव